Research Papers

# भुमिहीन मजुरः स्थिती व समस्या

डॉ.भालचंद्र रू.देशमुख
सहा.प्राध्यापक,जी.एन.आझाद समाजकार्य महा.पुसद

## प्रस्तावना :—

भारत स्वंतत्र झाला त्यावेळी स्वंतत्र भारताची दिशा काय असावी हा विचारप्रवाह प्रारंभ झाला. गांधीजी ग्रामस्वराज्याचे स्वप्न पाहात होते. त्यांच्या मते खरा भारत खेडयातूनच वास्तव्य करीत असल्यामुळे खेडयांच्या विकासावर आधारीत व्यवस्थेला प्राधान्य दिले पाहिजे. मोठया उदयोग धंदयांऐवजी, लघुउदयोग कुटीर उदयोग यांना चालना देवनू ग्रामीण जनतेला रोजगाराची संधी प्रदान करून त्यांना विकासाच्या प्रवाहात येण्याची संधी दिली पाहीजे. तर नेहरूजी याविरूध्द मताचे होते. त्यांचे मते मोठया औदयोगीकरणाला प्राधान्य देवनू, मोठ मोठी धरणे बांधुन विकास साध्य केला पाहिजे. शेवटी मिश्र स्वरूपाची अर्थव्यवस्था मान्य करून त्यापध्दतीने वाटचाल केल्या गेली. कालांतराने म्हणजेच सन 1991 मध्ये नविन अर्थव्यवस्था स्विकारली जीचा मुख्य आधार जागतीकिकरण होते. या दोन्ही अर्थव्यवस्थेनी भुमिहीन मजुरांचा विचार केलाच नाही. ना त्यांना विकासाची संधी दिली ना त्यांना या प्रवाहात येण्यासाठी प्रोत्साहीत केले. परिणाम असा झाला एकाच देशात दोन देश निर्माण झालेत. ज्याचे एक नाव 'इंडिया' जो श्रीमंत उदेयागपतींचा म्हणून ओळखल्या जातो तर दुसरे नाव 'भारत', जो गरीब, भुकेल्या, दरिद्र, बेराजगार भुमिहीन मजुरांचा म्हणून ओळखल्या जातो. भुमिहीन मजुरांच्या वाटयाला कालही दुःख, कश्ट, वेदना, अवहेलना हयाच नित्याच्या बाबी होत्या तर आजही भुमिहीन मजुर त्याच दारीद्रयाच्या चक्रात जगतो आहे.

▪*कि वर्ड* – भुमिहीन, मनेरगा, स्थलांतर, दारिद्रय, जीडीपी, एनएसएसओ

भारत हा जगातील सर्वाधिक गतीने आर्थिक प्रगतीकडे वाटचाल करतो आहे. जिथे 1991 च्या अगोदर आर्थिक वृध्दीदर 5 टक्के पेक्षाही कमी होता, तो नविन आर्थिक धोरणानंतर सतत वाढत असून सन 2010 मध्ये 8.3 टक्के वर स्थिरावला. एकीकडे ही स्थिती असली तरी मात्र ग्रामीन भारताचे चित्र दिवसेंदिवस अधिकच भयावह बनत आहे. निश्चीतच ग्रामीण दारीद्रयाच्या आकडेवारीत सन 1981 नतंर (59.8 टक्के, 1993—94 36 टक्के, 2004—05 मध्ये 27.5 टक्के) घसरण दिसून येत असली तरी राश्ट्रीय नमुना पाहणीच्या 61 राउंड नंतर एकूण गरीब संख्येमध्ये 75 टक्के गरीब ग्रामीण भारतातूनच वास्तव्य करीत असल्याचे व त्यामध्ये भुमिहीन मजुरांचा समावेश असल्याचे निश्पन्न झाले.

राष्ट्रीय नमुना पाहणीच्या 59 राउंड नुसार जवळवास 6.6 टक्के ग्रामीण कुटुंब भुमिहीन असून, 3.4 टक्के कुटंबाकडे 0.002 हेक्टर पेक्षा कमी जमीन आहे. त्यांचा सुध्दा समावेश भुमिहिन गटामध्येच केल्या जातो. भारतात भुमिहीन कुटुंबाना निरनिराळया योजनेअंतर्गत जमीन वाटप केल्या जात असल्याचे आकडेवारीवरून दिसून येत असले, तरी मात्र भुमिहीनांच्या संख्येत अद्याप कोणत्याही प्रकारची घट आलेली नाही.

सप्टे. 2006 मध्ये देशातील अनेक राज्यांमधून ग्रामीण भुमिहीन जनतेला 6.01 मिलीयन हेक्टर शासकीय जमीन वाटप करण्यात आली (जीओआय 2007). सिलींगच्या अतिरीक्त जमिनीअंतर्गत 4.9 मिलीयन एकर जमीन एकूण 5.4 मिलीयन लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली, ज्यामध्ये 2.1 मिलीयन अनुसुचीत जाती व 0.9 मिलीयन अनुसुचीत जमीतीच्या कुटुंबाचा समावेश होता. असे असले तरी राश्ट्रीय स्तरावर भुमिहीनांची संख्या सारखीच आढळते. सन 1971—72 मध्ये एकूण 9.6 टक्के कुटुंब भुमिहीन होते, तर 1982 व 1992 मध्ये 11.3 टक्के व 2003 मध्ये 10 टक्के (एनएसएसओ 2006) कुटुंब भमिहीन होते.

महाराश्ट्रामध्ये भुमिहीनांची संख्या सर्वाधिक (17.7 टक्के) असून राश्ट्रीय संख्येच्या (10 टक्के) तुलनेत जवळपास दुप्पट आढळते. रोजगाराच्या अन्य साधनांचा अभाव, शासकीय योजनांच्या अमंलबजावनीत भ्रश्टाचार, यामुळे भुमिहीन मजुरांचे जीवनमान अत्यंत खालावत चालले असून दारिद्रयाचा फास दिवसेंदिवस अधिकच आवळला जात आहे. एकीकडे देशाचे दरडोई उत्पन्न वाढत असल्याचे दिसून येते, तर दुसरीकडे भारतातील 80 टक्के लोकांना प्रतिदिवसासाठी रू. 20 पेक्षा सुध्दा कमी मजुरीवर दिवस काढावे लागत आहे (अर्जुनसेन गुप्ता 2007). ही आकडेवारी विशम

**Please cite this Article as :** *डॉ.भालचंद्र रू.देशमुखे ,भुमिहीन मजुरः स्थिती व समस्या* **: Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**

विकासाची स्थिती स्पष्ट करते

प्रस्तूत शोधनिबंधातून भुमिहीन मजुरांच्या समाजिक–आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकण्यात आला असून, त्यासंदर्भातील समस्यांचा उहापोह करण्यात आला आहे. ज्याचा मुख्य आधार प्राथमिक तथ्य आहे.

***षोधनिबंधाचे उद्येष***

प्रस्तूत शोधनिबंधाचा उद्येश भुमिहीन मजुरांची सामाजिक–आर्थिक स्थिती अभ्यासणे तथा त्यांच्या समस्यांचा उहापोह करणे हा आहे.

अध्ययन पध्दती

अध्ययनासाठी भुरकेची वाडी ता.औंढा जि.हिंगोली येथील भुमिहीन मजुरांचा समावेश करण्यात आला असुन 'जनगणना पध्दती' अंतर्गत गावातील सर्वच भुमिहीन मजुरांचा समावेश केला आहे. भुमिहीन मजुरांचा शोध घेण्यासाठी 'स्नोबॉल' पध्दतीचा उपयोग करण्यात आला. याअंतर्गत गावातील एकूण 240 कुटुंबापैकी 130 भुमिहीन कुटुंबाचा समावेश करण्यात आला. तथ्य संकलनासाठी संरचित मुलाखत अुनसुची वापरून गुणात्मक तथा सांख्याकीय तथ्य गोळा केले. सांख्याकीय माहितीचे एसपीएसएस द्वारे विश्लेशन केलेले आहे.

***अध्ययन क्षेत्र एक दृष्टिक्षेप***

भुरकेची वाडी हे गाव मराठवाडयातील हिंगोली जिल्हयात असून सन 2001 च्या जनगणनेनुसार गावाची लोकसंख्या 1,340 आहे, जी एकूण 240 कुटुंबातून वास्तव्य करते. गावात 100 टक्के लोकसंख्या अनुसुचीत जमातीची असून, 160 कटुंब दारिद्रय रेशेखाली आहेत. गावाचा साक्षरता दर 57.25 असून पुरूशांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी आहे.(पुरूश–674 / स्त्री–666).

▪ ***भुमिहीन मजुरांची सामजिक–आर्थिक स्थिती***

अध्ययनात सहभागी भुमिहीन मजुर हे सर्व अनुसुचीत जमातीचे असून त्यांच्या वयोगटाचा विचार करता, 31 ते 40 वर्श वयोगटातील भुमिहीनांचे प्रमाण सर्वाधिक होते. भुमिहीनांमध्ये निरक्षरता अधिकांश प्रमाणात आढळून येत असून, हे प्रमाण 53.84 टक्के होते (सारणी 1). सन 2001 च्या जनगणनेनुसार गावातील साक्षरता दर 57.25 होता. यातुलनेत भुमिहीनांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आढळते.

वयोगटानुसार शिक्षणाच्या प्रमाणात स्पश्ट दिसून येते की, जवळपास 95 टक्के साक्षरता 20 ते 30 या वयोगटात होती. जसजसे वयोगट वाढत जाते तसतसे शिक्षणाचे प्रमाण कमी होत गेलेले आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे त्याकाळात शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या, तसेच शिक्षणा बाबत फारसे महत्व नव्हते. शिक्षणाच्या बाबतीत एक महत्वाची बाब स्पश्ट दिसून येते, ती म्हणजे दहावी नंतर कोणाचेही शिक्षण झालेले नाही. तसेच 41 वयानंतर केवळ एक भुमिहीन व्यक्ती 5 ते 7 वर्गापर्यांत शिकलेला दिसतो. याविशयीचे कारण असे स्पश्ट करते की, गावात 7 व्या वर्गापर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. 'जिथपर्यंत गावात शाळा तोपर्यंत शिक्षण' हे घोशवाक्य गावाने रूजविलेले आहे. त्यामुळे पुढे शिक्षण घेतल्या जात नाही. कारण बाहेरगावी शिक्षण घेणे आर्थिक दृश्टिने परवडत नाही. शासनानाने अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या नंतर सुध्दा आजच्या काळातही बाहेरगावी जावून शिक्षण घेण्याची मानसिकता बदलेली नाही.

भुमिहीनांमध्ये सर्वाधिक कुटुंब दारिद्रय रेशखाली दिसून येत असून 5 ते 7 सदस्य संख्या असलेल्या कुटुंबाची संख्या सर्वाधिक प्रमाणात दिसून येते. भुमिहीन, मजुरीसाठी कृशीक्षेत्रावर निर्भर दिसतात. 93.07 टक्के भुमिहीन कृशीक्षेत्रात मजुरी करीत असून उर्वरीत बांधकाम क्षेत्राशी जोडलेले आहेत. दिवसाकाठी मिळणाऱ्या मजुरीमध्ये 59.23 टक्के भुमिहीनांना रू. 100 पेक्षा कमी मजुरी प्राप्त होते. कुटुबातील सदस्य संख्येनुसार मिळणाऱ्या मजुरीची स्थिती पाहता आर्थिक स्थिती अतिशय दयनिय असल्याचे दिसून येते.

5 सदस्यांपेक्षा अधिक सदस्य संख्या असलेल्या कुटुंबाची संख्या अधिकांश प्रमाणात दिसून येते. त्यातुलनेत दिवसाकाठी मिळणारे उत्पन्न अत्यल्प आहे. 130 कुटुंबात एकूण 860 सदस्य वास्तव्य करीत होते. सारणी 2 नुसार प्रतिदिवशी मिळणाऱ्या मजुरीची शेवटची रक्कम घेतल्यास सर्व कुटुंबांमिळुन मिळणारी मजुरी रू. 15,500 होते. एकूण सदस्य संख्या व प्रतिदिवशी मिळणारी सर्व मजुरीची रक्कम यांची सरासरी काढल्यास प्रत्येक व्यक्तीचे सरासरी दिवसाची मजुरी ही केवळ रू.18.02 इतकी होते. अर्जुन सेन गुप्ता (2007) आपल्या अहवालात, 80 टक्के भारतीयांचे दिवसाकाठी मिळणारे उत्पन्न रू.20 पेक्षा कमी असल्याचे नोंद करतात. 'इंडियन कौंसील ऑफ मेडिकल रिसर्च' (आयसिएमआर) कश्टाचे काम करणाऱ्या व्यक्तीला लागणाऱ्या उर्जेच्या आधारे प्रत्येक सहा व्यक्तीच्या कुटुबाला प्रत्येक दिवसासाठी रू.211 खर्च येत असल्याचे स्पश्ट करते. त्यानुसार अशा कुटुंबाला केवळ अन्नधान्यासाठी महिण्यासाठी रू 6,330 म्हणजेच वर्शासाठी रू.75,960 खर्च अपेक्षित आहे. अन्नधान्यासोबत इतर खर्चाचा रेशो 1:5 असा आहे. म्हणजेच रू.3,79,800 ऐवढे वार्शीक उत्पन्न अपेक्षित आहे. सध्याच्या किंमतीचा आधार घेतल्यास चांगल्या प्रकारचे समाधानकारक जीवन जगण्यासाठी महिण्याकाठी एका कुटुंबाला रू.37,980 तर प्रत्येक दिवसाला रू.1,266 खर्च अपेक्षित आहे (चंडी 2009:97).

आयसिएमआरच्या खर्चाचा विचार करता भुमिहीन मजुरांसाठी ते एक दिवास्पप्नच ठरेल. कारण भारतातील चांगल्या क्षेत्रात नोकरी करणाऱ्या व्यक्तीचे सुध्दा महिण्याकाठीचे उत्पन्न रू 37,980 ऐवढे नाही. यातुलनेत भुमिहीन मजुरांचा विचार केला तर प्रत्येक दिवसाच्या मजुरीच्या आधारे दरडोई उत्पन्न रू.5,986 इतके होते. म्हणजेच जिथे महिण्याचा खर्च अपेक्षित आहे, त्यापेक्षा कितीतरी कमी उत्पन्न वर्शाचे आहे. यावरून भुमिहीन मजुरांच्या सामाजिक आर्थिक स्थितीची कल्पना येते. अन्न घेण्यासाठीच पुरक उत्पन्न नसतांना अन्य सुविधांचा विचार करणेच योग्य ठरत नाही. सेंट्रल स्टॅटीस्टीक ऑर्गनायझेशने प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार सन 2010–11 मध्ये भारतीयांच्या दरडोई उत्पन्नात 17.9 टक्क्यांनी वाढ झाली. सन 2009–10 च्या रू.46,492 या दरडोई उत्पन्नावरून सन 2010–11 च्या दरडोई उत्पन्नाने रू. 54,834 वर झेप घेतली आहे (दि टाईम्स ऑफ इंडिया 2011). यातुलनेत महाराश्ट्राचे दरडोई उत्पन्न रू.83,471 इतके होते (अनालेटीकल सर्वीस 2012). यामध्ये मुंबई (रू.1.25लाख), पुणे (रू.1.11लाख), ठाणे (रू.1.05 लाख) यांचे दरडोई उत्पन्न रू.1 लाखाच्या वर आहे. तर वाशीम (रू.36,087), नंदुरबार, (रू.36,202) उस्मानाबाद (रू.38,145) यांचे अत्यल्प दरडोई उत्पन्न होते (दि टाईम्स ऑफ इंडिया 2011). अध्ययनात सहभागी भुमिहीन मजुरांच्या दरडोई उत्पनाचा राश्ट्रीय तथा महाराश्ट्राच्या स्तरावर तुलना करावयाची झाल्यास आर्थिक विशमता स्पश्ट होते. महाराश्ट्रातील सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेल्या वाशिम जिल्हयाच्या एक चतुर्थांश सुध्दा उत्पन्न भुमिहीन मजुरांचे होत नाही.

कुटुंबातील सदस्य संख्येच्या तुलनेत उत्पन्न कमी असल्यामुळे दैनंदिन गरजा भागविने शक्य होत नाही पर्यायाने हया गरजांच्या पुर्ततेसाठी कर्ज काढावे लागते. ग्रामीण भागात कर्जाचा मुख्य स्त्रोत म्हणून सावकारच असतो, ज्याच्या व्याजाचा दर सवाई ते दिडी असा असतो. त्यामुळे एकदा काढलेले कर्ज परत करण्यातच आयुश्य संपते. अशा कर्जाखाली जगणाऱ्या भुमिहीनांची संख्या 50 टक्केच्या वर होती.

***भुमिहीन मजुरांच्या समस्या***

भुमिहीन मजुरांची मुख्य समस्या स्थानीक पातळीवर रोजगार उपलब्ध न होने ही आहे. सिंचन सुविधांचा अभाव असल्यामुळे, तसेच गावातील शेतकऱ्यांकडे 1 ते 2 हेक्टर जमीन असल्यामुळे सर्वांना वर्शभर रोजगार उपलब्ध होत नाही. जास्तीत जास्त 6 महिने रोजगार उपलब्ध होतो. त्यानंतर रोजगाराच्या शोधात भटकंती करावी लागते. जी एकतर तालुक्याच्या ठिकाणी अथवा पुणे, मुंबई अशा ठिकाणी

असते. सर्वाधिक कुटुंब गावातील हंगाम संपल्यानंतर ऊसकटाईच्या कामासाठी स्थलांतर करतात. साधारणतः हे स्थलांतर नोव्हेंबर ते एप्रील महिण्यांपर्यंत राहाते. याकाळात मुले सुध्दा सोबत असल्यामुळे त्यांना शाळेपासून वंचीत रहावे लागते. तसेच बिपीएल कार्डावर मिळणारे राशन सुध्दा मिळत नाही. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी सुविधांचा अभाव असतो. म.गांधी राश्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जॉब कार्ड काढलेले असले तरी यामाध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिल्या जात नाही. सन 2009–10 वगळता यामाध्यमातून रोजगार मिळालेला नाही.

***भुमिहीन मजुरांची स्थिती एक दृष्टिक्षेप***

▪ गावातील साक्षरतेच्या (57.25 टक्के) तुलनेत भुमिहीन मजुरांमध्ये हे प्रमाण कमी (46.16 टक्के) आढळले.

▪ गावातील कुटुंबातील सदस्य संख्येचा रेशो 1:5.58 असा आहे. यातुलनेत भुमिहीन कुटुंबामध्ये 1:6.61 असा आहे.

▪ प्रतिव्यक्ती प्रतिदिवसाचे सरासरी उत्पन्न रू.18.02 इतके आहे.

▪ महाराश्ट्राचे दरडोई उत्पन्न रू. 83,471 आहे. तर भुमिहीनांचे दरडोई उत्पन्न केवळ रू 5,622 आहे.

▪ सर्वाधिक कुटुंबाच्या घराचे स्वरूप कच्च्या स्वरूपाचे असून, आकारमान सुध्दा लहान आढळले.

▪ भुमिहीनांमध्ये व्यसनाधिनता अधिक असून (48 टक्के )कश्टाचे काम करावे लागत असल्यामुळे मदयपान करावे लागते असा अपसमज असणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आढळले.

▪ सामाजिक दर्जा हा आर्थिक स्थितीवर आधारीत असल्याचे 96 टक्के मजुर मानतात. गावात सर्वांचीच आर्थिक परिस्थिती खालावलेली असल्यामुळे सामाजिक दर्जाचा कधी विचार केल्या जात नाही. परंतू एक मजुर म्हणुन जेंव्हा सामाजिक प्रश्न उपस्थित केल्या जातो, तेंव्हा त्याची दखल घेतली जात नसल्याचे 62 टक्के मुजुर मत व्यक्त करतात.

▪ मजुरीचे काम तथा स्थलांतर यामुळे 66 टक्के मजुर ग्रामसभेला उपस्थित नसतात. तसेच ग्रामसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नांची दखल घेतल्या जात नसल्याचे ग्रामसभेला उपस्थित असणाऱ्या एकूण मजुरांपैकी 70 टक्के मजुर मत व्यक्त करतात.

▪ गावात वर्शभर रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे स्थलांतर करावे लागते. हे प्रमाण 59 टक्के आढळून आले.

▪ गावात 'मनेरगा' अंतर्गत रोजगार उपलब्ध करून दिल्या जात नाही.

▪ आदिवासी तथा भुमिहीन मजुरांसाठी शासनाने विवीध योजना राबविलेल्या आहेत. प्रत्यक्षात मात्र केवळ 16 टक्के भुमिहीन कुटुंबानी त्याचा लाभ घेतलेला होता. ज्यामध्ये घरकुलाचा लाभ घेणाऱ्यांची संख्या सर्वाधिक होती.

***निष्कर्श***

भारताच्या विकास दरामध्ये सातत्याने वृध्दी होत आहे, तद्‌वतच दरडोई उत्पनात सुध्दा मोठया प्रमाणावर वाढ होत असल्याचे दिसून येते. विकास दर वाढीतून दरडोई उत्पन्नात वाढ होणे ही कमप्राप्त बाब आहे. यातूनच सर्वसामान्यांच्या मानवी विकासात भर पडावी अशी साधार अपेक्षा असते. परंतू भारताच्या बाबतीत हे चक्र उलटया दिशेने फिरते आहे. एकीकडे प्रचंड समृध्दी आणि तांत्रीक प्रगती तर दुसरीकडे प्रचंड दारिद्रय आणि मागासलेपणा (अलेक्झांडर 2010). तांत्रीक प्रगतीतून भरमसाठ पगाराची नोकरी तर दुसरीकडे केवळ एकवेळचे भुक शमवेल ऐवढा सुध्दा रोजगार/मजुरीचा अभाव, यातून भुकबळीची संख्या सतत वाढत असून याचा सामना करण्यात पाकिस्तान, श्रीलंकेपेक्षा सुध्दा भारत माघारल्याचे सीडब्ल्युसीच्या सर्वेक्षणनाने नमुद केले आहे (लोकमत 2011:1). जगाच्या एकूण भुकेल्या माणसांपैकी 20 टक्के भारतात आहेत आणि भारतात दर 100 माणसांमागे 15 माणसे भुकेली आहेत (कारंजीकर 2011:4). अशा दयनिय परिस्थितीत भुमिहीन मजुर, जगत असून मानवी विकास तथा त्यासंदार्भातील सर्व सिध्दांत त्यांनी नाकारले आहेत.

सारणी 1
सामाजिक आर्थिक स्थिती व समस्या

| अक्र | सामजिक स्थिती | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | वयोगट | 1) 20 ते 30 वर्ष | 34 | 26.15 |
| | | 1) 31 ते 40 वर्ष | 45 | 34.61 |
| | | 3) 41 ते 50 वर्ष | 30 | 23.07 |
| | | 4) 51 ते 60 वर्ष | 21 | 16.15 |
| 2 | कुटुंबातील सदस्य संख्या | 1) 1 ते 4 | 38 | 29.23 |
| | | 2) 5 ते 8 | 74 | 56.92 |
| | | 3) 8 ते 11 | 18 | 13.84 |
| 4 | शिक्षण | 1) निरक्षर | 70 | 53.84 |
| | | 2) 1 ते 4 वर्ग | 35 | 26.92 |
| | | 3) 5 ते 7 वर्ग | 15 | 11.53 |
| | | 4) 8 ते 10 | 10 | 07.69 |
| 5 | घराचे स्वरूप | 1) पक्के सिमेंटचे | 15 | 11.53 |
| | | 2) कच्चे मातिचे | 80 | 61.53 |
| | | 3) कुडाचे | 35 | 26.92 |
| 6 | दारिद्रय रेषेचे कार्ड | 1) आहे | 93 | 71.53 |
| | | 2) नाही | 37 | 28.46 |
| 7 | मजुरीचे क्षेत्र | 1) कृषी | 121 | 93.07 |
| | | 2) बांधकाम | 09 | 06.93 |
| 8 | कुटंबाचे सरासरी दैनीक उत्पन्न | 1) रू100 रू पेक्षा कमी | 77 | 59.23 |
| | | 2) रू100 ते 125 | 23 | 17.69 |
| | | 3) रू126 ते 150 | 13 | 10.00 |
| | | 4) रू151 ते 175 | 17 | 13.07 |
| 9 | कर्जाची स्थिती | 1) कर्ज आहे | 66 | 50.76 |
| | | 2) कर्ज नाही | 64 | 49.24 |
| 10 | कर्जाचे स्त्रोत | 1) सावकार | 29 | 43.94 |
| 11 | गावातील रोजगाराची स्थिती | 1) 5 ते 6 महिने | 86 | 66.15 |
| | | 2) 7ते 9 महिने | 44 | 33.85 |
| 12 | रोजगाराच्या शोधात स्थलांतर | 1) होय | 77 | 59.23 |
| | | 2) नाही | 53 | 52.77 |
| | स्थंलातरीत काळात समस्या | 1) मजुरी वेळेवर मिळत नाही | 23 | 29.87 |
| | | 2) सोई सुविधांचा अभाव | 37 | 48.05 |
| | | 3) राशन मिळत नाही | 10 | 12.98 |
| | | 4) मुले शिक्षणापासून वंचीत राहतात | 07 | 9.09 |
| 14 | मनेरगाअंतर्गत काम | 1) होय | 23 | 17.69 |
| | | 2) नाही | 107 | 82.31 |
| 15 | शासकीय योजनांचा लाभ | 1) होय | 21 | 16.15 |
| | | 2) नाही | 101 | 83.85 |

स्त्रोत : फिल्ड डाटा

सारणी 2
कुटुबातील सदस्य संख्येनुसार प्रतिदिवशी मिळणारी मजुरी (कसांतील आकडेवारी शेकडा प्रमाण दर्शवितात)

| कुटुंबातील सदस्य संख्या | प्रतिदिवशी मिळणारी मजुरी | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रू100पेक्षा कमी | रू100 ते 125 | रू 126 ते150 | रू151 ते 175 | एकूण(शे.प्र.) |
| 1 ते 4 | 27(71.05) | 03(07.89) | 05(13.15) | 03(07.80) | 38 (100) |
| 5 ते 8 | 48(64.86) | 16(21.62) | 03(4.05) | 07(09.45) | 74 (100) |
| 9 ते 11 | 02(11.11) | 04(22.23) | 05(27.77) | 07(38.89) | 18 (100) |
| एकूण | 77(59.23) | 23(17.69) | 13(10.00) | 17(13.07) | 130(100) |

(फिल्ड डाटा)

सारणी 3

भुमिहीनांच्या वयोगटानुसार शिक्षणाचे प्रमाण(कसांतील आकडेवारी शेकडा प्रमाण दर्शवितात)

| वयोगट | शिक्षण | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | 1 ते 4 वर्ग | 5 ते 7 वर्ग | 8 ते 10 वर्ग | एकूण(शे.प्र.) |
| 20 ते 30 वर्ष | 02(5.88 ) | 16(47.05 ) | 08(23.52 ) | 08(23.52) | 34(100) |
| 31 ते 40 वर्ष | 23(51.11 ) | 14(31.11 ) | 06(13.33 ) | 02(04.44 ) | 45(100) |
| 41 ते 50 वर्ष | 26(90.47 ) | 03(10.00 ) | 01(3.33 ) | 00(00.00 ) | 30(100) |
| 51 ते 60 वर्ष | 19(90.47 ) | 02(09.53 ) | 00(00.00 ) | 00(00.00 ) | 21(100) |
| एकूण | 70(53.84 ) | 35(26.92 ) | 15(11.53 ) | 10(07.69 ) | 130(100) |

(फिल्ड डाटा)

## *संदर्भ*

अलेक्झांडर, पी.सी. 2010. 'भारतापुढील यक्षप्रश्न'. लोकमत. नागपूर. 12 एप्रील.

अर्जुनसेन,गुप्ता. 2007.'836 मिलीयन इंडीयन्स लाईव्ह ऑन लेस दॅन रू.20 अ डे'.डब्ल्युडब्ल्युडब्ल्यु लाईव्ह दि.1 सप्टे.

चंडी,के.2009.'सिच्युएशन ऑफ फार्मर्स इन इंडिया',सोशल ॲक्शन. दिल्ली. व्हीओएल 59, जाने–मार्च पृ 97

गव्हर्मेंट ऑफ इंडिया. 2007.'रिपोर्ट ऑन कंडीशन ऑफ वर्क ॲन्ड प्रमोशन ऑफ लाइव्हहुड इन दि अन ऑर्गनाइझ सेक्टर, नॅशनल कमीशन फॉर इंटरप्राईसेस इन दि अनऑर्गइझ सेक्टर, ऑगस्ट 2007 पृ116

कारंजीकर, दिपक. 2011. 'बिकट आव्हान' लोकमत. नागपूर. 6 मार्च, पृ 4

नॅशनल सॅपल सर्व्हे ऑर्गनायझेशन. 2006. 'रिपोर्ट ऑन हाउसहोल्ड ओनरशिप होल्डींग्ज इन इंडिया',जिओव्ही ऑफ इंडिया. नोव्हे.2006

.........2011.'भूकबळीचा सामना करण्यात भारत नापास?'. लोकमत. नागपूर. 12 ऑक्टो, पृ 1

.........2011. दि इकोनॉमीक टाईम्स. मुंबई, 31 मे.

.........2011. दि.टाईम्स ऑफ इंडिया. मुंबई, 23 मार्च

.........2012.अनालेटीक सर्वीस.कॉम. 5 जानेवारी.

**Please cite this Article as :** *डॉ.भालचंद्र रू.देशमुखे* **,** *भुमिहीन मजुरः स्थिती व समस्या* **: Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**